SPECIAL OFFERS
ई-पेपर वेबसाईट बनवा
फक्त २९९९/-
SAVE UP TO 90%
NEWS
9359421909
ONLY THIS WEEK!
ORDER NOW
www.abhibee.com

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक

● वर्ष : ०३ ● अंक : ००१ ● पुणे ● शुक्रवार, दि. १२ सप्टेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



पुण्यात प्रभागरचना सुनावणीत गोंधळ 3



महापौर आरक्षण निश्चितीच्या प्रक्रियेला वेग 4

## २ वर्षांच्या बालकाचा धडकेत मृत्यू

### लोहगावमधील हवाई दलाच्या वसाहतीतील दुर्घटना

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मोटारीच्या धडकेत दोन वर्षांच्या बालकाचा मृत्यू झाल्याची घटना लोहगावमधील हवाई दलाच्या वसाहतीत घडली. या प्रकरणी मोटारचालक महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.विदार्थ विपीन मावी (वय दोन) असे मृत्युमुखी पडलेल्या बालकाचे नाव आहे. याबाबत विदार्थचे वडील विपीन राजसिंग मावी (वय ३४, सध्या रा. हवाई दल वसाहत, लोहगाव) यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विपीन मावी हे हवाई दलात अधिकारी आहेत. त्यांचा दोन वर्षांचा मुलगा विदार्थ गुरुवारी (११ सप्टेंबर) दुपारी साडेबाराच्या सुमारास हवाई दल वसाहतीतील घरासमोर खेळत होता. त्या वेळी वसाहतीत राहणाऱ्या एका मोटारचालक महिलेने घरासमोर खेळणाऱ्या विदार्थला धडक दिली. अपघातात विदार्थ गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपाचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.अपघातास जबाबदार ठरल्याप्रकरणी मोटार चालक महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार धेंडे तपास करत आहेत.

### राष्ट्रभूषण चौकात दुचाकीस्वाराचा मृत्यू

**छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावर भरधाव वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी पहाटे घडली. अपघातानंतर पसार झालेल्या वाहनचालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. बळीराम साहेबराव चव्हाण (वय २१, रा. पांगरी, बदनापूर, जि. जालना) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. याबाबत राम साहेबराव चव्हाण (वय २३) यांनी खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.**

## बांगलादेशची विजयी सलामी!

- **लिटन दासच्या अर्धशतकाच्या बळावर हाँगकाँगवर मिळवला दमदार विजय**



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

आशिया चषक २०२५ स्पर्धेला दमदार सुरूवात झाली आहे. स्पर्धेतील तिसऱ्या सामन्यात हाँगकाँग आणि बांगलादेश हे दोन्ही संघ आमनसामने आले होते.या सामन्यात हाँगकाँगने बांगलादेशसमोर विजयासाठी १४४ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना बांगलादेशने ७ गडी राखून विजयाची नोंद केली आहे. या सामन्यात बांगलादेश संघाचा कर्णधार लिटन दासने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हाँगकाँगकडून प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या झीशान अलीने ३० धावांची खेळी करून दमदार सुरूवात करून दिली. अंशुमन राठने ४ धावा केल्या. त्यानंतर बाबर हयातने १४ धावांचे योगदान दिले. मधली फळी सांभाळताना निझाकत खानने ४० चेंडूंचा सामना करत सर्वाधिक ४२ धावांची खेळी केली. तर कर्णधार यासीम मुर्तजाने २८ धावांचे योगदान दिले. यासह हाँगकाँगला २० षटकांअखेर ७ गडी बाद १४३ धावा करता आल्या.

बांगलादेशला हा सामना जिंकण्यासाठी १४४ धावांची गरज होती. बांगलादेशकडून डावाची सुरूवात करताना परवेज हुसेन इमोन आणि तांझीद हसन तमीम या जोडीने पहिल्या विकेटसाठी अवघ्या २४ धावा जोडल्या. परवेज १९ तर तांझीद अवघ्या १४ धावा करून माघारी परतला.संघाचा कर्णधार लिटन दास शेवटपर्यंत उभा राहिला. त्याने तौहीद हृदॉयसोबत मिळून १०० हून अधिक धावांची भागीदारी केली आणि बांगलादेशला स्पर्धेतील पहिला विजय मिळवून दिला.

लिटन दासने या डावात फलंदाजी करताना ५९ धावांची खेळी केली. तर तौहीद हृदॉय ३५ धावांवर नाबाद राहिला. यासह बांगलादेशने हा सामना ७ गडी राखून आपल्या नावावर केला.

## ठळक बातम्या

### बंडू आंदेकरसह साथीदारांविरुद्ध ‘मकोका’

**पुणे (आरंभ पर्व) : नाना पेठेतील टोळीयुद्ध, तसेच कौटुंबिक वादातून आयुष कोमकर याच्या खून प्रकरणात आंदेकर टोळीचा म्होरक्या सूर्यकांत उर्फ बंडूअण्णा आंदेकर याच्यासह १३ साथीदारांविरुद्ध पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई करण्याचे आदेश दिले. अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेणारा आयुष हा बंडू आंदेकरचा नातू होता. माजी नगरसेवक वनराज आंदेकर याच्या खुनाचा बदला घेण्यासाठी या प्रकरणातील आरोपी गणेश कोमकर याचा मुलगा आयुष याचा आंदेकर टोळीने खून घडवून आणला. या प्रकरणी आठ जणांना अटक करण्यात आली आहे. खून प्रकरणात पसार आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.**

### काम बंदची मागणी

**पुणे (आरंभ पर्व) : पंढरपूर-महाड (एनएच ९६५) या पालखी महामार्गावरील भोर तालुक्यातील वडगांव-डाळ पासून वरंधा घाटमार्गे महाडकडे जाणाऱ्या रस्त्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्यूडी) आणि भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (एनएचएआय) यांच्याकडून रुंदीकरणाचे काम करण्यात येत आहे. मात्र हे काम चुकीच्या पद्धतीने करण्यात येत असल्याने सुमारे ५०० शेतकऱ्यांच्या १०० हेक्टर क्षेत्र बाधित होत असल्याचा आरोप शेतकरी विकास संस्थेकडून करण्यात आला आहे. २०२१ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आभासी पद्धतीने उद्घाटन करण्यात आले होते. त्या पार्श्वभूमीवर भोर तालुक्यातून जाणाऱ्या महामार्गावरील बाधितांनी प्रकल्पाच्या कामाला विरोध दर्शवून भूसंपादनाची कायदेशीर प्रक्रिया व्यवस्थित पार पडेपर्यंत रस्ता रुंदीकरणाचे काम थांबवावे, या मागणीसाठी मंगळवारी (९ सप्टेंबर) सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.**

## पुण्यात भाजप इच्छुकांचे ‘मौनव्रत’

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महापालिकेच्या प्रारूप प्रभागरचनेने सत्ताधारी महायुतीबरोबरच महाविकास आघाडीतील इच्छुकांची कोंडी केली असून भाजपमधील अनेक इच्छुकही अडचणीत सापडले आहेत. प्रभागांचे तुकडे पाडताना भाजपच्या काही स्थानिक वरिष्ठ नेत्यांनीच स्वतःच्या पक्षातील काही इच्छुकांना बाजूला करण्याची व्यूहरचना आखल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

यामुळे इच्छुक भाजप नेते द्विधा मनःस्थितीत आहेत. प्रभागरचनेवर उघडपणे बोलल्यास पक्षाकडून उमेदवारी धोक्यात येईल, आणि गप्प राहिल्यास मतदार नाराज होतील, या कचाट्यात सध्या अनेकांनी मौनव्रत स्वीकारले आहे. काहींनी मात्र आपले विश्वासातील कार्यकर्ते पुढे करून हरकती दाखल केल्या आहेत. परिणामी, प्रभागरचनेवर हरकतींचा पाऊस पडला असून, सुनावणीनंतर बदल होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, प्रभाग रचना तयार करताना भाजप बहुल भाग जोडणे आणि महाविकास आघाडीला यश मिळवून देणारे प्रभाग फोडणे, अशा हालचाली झाल्याचे आरोप होत आहेत. या प्रक्रियेत महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), शिवसेना (ठाकरे) तसेच महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि शिवसेना (शिंदे) यांचेही इच्छुक अडचणीत आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटातील काही इच्छुकांनी तर थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यापुढे नाराजी मांडली आहे.

भाजप गोटातही काही विद्यमान नगरसेवकांचे राजकीय दोर कापले गेल्याची चर्चा सुरू आहे. मात्र, हरकत घेतल्यास पक्षविरोधी ठरवले जाईल या भीतीने ते मौन बाळगून आहेत. परिणामी, त्यांच्या वतीने इतरांनी हरकती दाखल केल्याचे दिसते.

राजकीय जाणकारांच्या मते, प्रभागरचनेतूनच संभाव्य बंडखोरी रोखण्याचा डाव भाजपने आखला आहे. कारण, मागील सात वर्षांत अनेक नेते अन्य पक्षांतून भाजपमध्ये दाखल झाले असून, प्रत्येकाला उमेदवारीची खात्री वाटत आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत भाजपमधील बंडखोरी अटळ असल्याचे संकेत मिळत आहेत. सध्या मात्र सर्वच इच्छुक मौन धारण करून आहेत. अंतिम प्रभागरचना जाहीर झाल्यानंतर मौनभंग होईल आणि भाजपमधील नाराजी उफाळून येईल, असा अंदाज वर्तविला जात आहे.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
वार्ताहर नेमणे आहे
पुणे आणि जिल्ह्यात लोकप्रिय दै.आरंभ पर्वसाठी खालीलप्रमाणे जिल्हा व तालुकास्तरावर वार्ताहर नेमणे आहेत.
सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व आरंभपर्व
पुणे जिल्हा
इंदापूर शहर, इंदापूर ग्रामीण, बारामती, उरुळी कांचन, यवत, केडगाव, सुपा, भिगवण, सासवड, पुरंदर,जेजुरी, नीरा, सोमेश्वर, माळेगाव, भोर, वेल्हा. चाकण, राजगुरूनगर, मंचर, जुन्नर, घोडेगाव, लोणी काळभोर
पुणे शहर
धायरी, स्वारगेट, हडपसर, कॅम्प, वडगाव बुद्रुक, पर्वती, डेक्कन, सिंहगड रोड, कात्रज, कोंढवा
इच्छुकांनी आपला बायोडाटा खालील ई-मेल वर पाठवावा.
aparvinfo@gmail.com
वार्ताहरांना मिळणाऱ्या सुविधा
आयडीकार्ड, नियुक्तीपत्र, युट्युबसाठी लागणारा माईक
(टीप - वरील गोष्टी देण्यापूर्वी किमान एक महिने काम करणे आवश्यक. आपले काम बघून पुढील निर्णय घेतला जाईल.)
दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त
नवचेतना राज्यस्तरीय पुरस्कार २०२८
समाजासाठी समर्पित कार्याला सलाम !
॥ पुरस्कार श्रेणी ॥
आदर्श जनसेवक
आदर्श समाजसेवक
आदर्श उद्योजक
आदर्श पत्रकार
आदर्श खेळाडू
आदर्श शिक्षक
आदर्श विधीज्ञ
उत्कृष्ट अधिकारी
विविध क्षेत्रातील जीवन गौरव
दिनांक : रविवार, 12 ऑक्टोबर 2025
ठिकाण : पुणे
चला एकत्र येऊ, प्रेरणा होऊ!
विविध क्षेत्रातील नामवंत मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे
आजच संपर्क साधा आणि आपली नोंदणी करा
आपल्या कार्याची दखल घेतली जाण्याची ही संधी नका गमावू!
पुरस्कार कार्यक्रमासाठी नोंदणी सुरू;आजच आपली स्पेस बुक करा
समाजासाठी झटणारे, प्रेरणा देणारे मान्यवर यासाठी नक्की नाव नोंदवा!
मा.श्री.प्रतिक गंगणे (व्यवस्थापकीय संपादक) 7276314142
मा.श्री.लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) 86052 84272
मा.श्री.अभिषेक मरगळे (मार्केटिंग हेड) 9359421909
मा.श्री.डॉ.विश्वासराव आरोटे (समूह संपादक) 9423388508

साप्ताहिक संपादकांसाठी
खास ऑफर
१ महिन्याचे ४ अंक (४ पानी)
फक्त ₹८,000/-
(पहिल्या ५ लोकांसाठी खास ऑफर !)
नंतरचे शुल्क (४ पाने – ४ अंक)
₹ १२,००० 
प्रिंटींगची सोय उपलब्ध (अतिरिक्त शुल्क आकारले जाईल)
मर्यादित कालावधीसाठीच ही ऑफर लागू आहे.
आजच तुमच्या साप्ताहिकासाठी सुवर्णसंधीचा लाभ घ्या!
संपर्क: प्रतिक गंगणे ७२७६३१४१४२ / ८६५७८६५७०२



# साप मेला नाही; पण दात काढले!

८ सप्टेंबरला सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालामुळे व्होटबंदी मोहीम अद्याप थांबली नसली तरी विशेष सखोल पुनरीक्षणाच्या नावाखाली लक्षावधी नागरिकांचा मताधिकारच काढून घेतला जाण्याची भीती काहीअंशी तरी कमी झाली. सर्वोच्च न्यायालयाने 'आधार' हा १२ वा पुरावा मानावा, असा स्पष्ट आदेश दिला. या निर्णयाला राष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाल्यास देशभर होऊ घातलेल्या 'एसआयआर' दरम्यान दहा एक कोटी लोकांचा मताधिकार शाबूत राहील. याद्दष्टीने हा आदेश ऐतिहासिक ठरेल.

निवडणूक आयोगाने बिहारात आरंभलेल्या मतदारयादीच्या विशेष पुनरीक्षणाच्या कार्यपद्धतीविषयी अनेक कायदेशीर प्रश्न आणि शंका उपस्थित केल्या गेल्या आहेत. त्यातील एकाही मूलभूत प्रश्नाचे उत्तर या आदेशातून मिळत नाही. नवी यादी बनवताना आयोगाने नेमकी कोणती कागदपत्रे स्वीकारावीत, या व्यावहारिक बाबीपुरताच हा आदेश मर्यादित आहे. प्रत्यक्षात हा मर्यादित प्रश्नच 'एसआयआर' संदर्भातला सर्वात मोठा प्रश्न बनला होता. निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेली एक अजब यादी हे याचे कारण होते. आजवर मतदारयादी दुरुस्तीदरम्यान तमाम मतदारांकडून कोणताही दस्तऐवज मागितला जात नव्हता. फक्त एखाद्याला नव्याने नाव नोंदवायचे असेल तर आयोगाचा फॉर्म ६ भरावा लागे. फक्त त्याच्याचकडून रूढ १२ दस्तऐवजांपैकी एक-दोन दस्तऐवज मागितले जात; परंतु 'एसआयआर'चा आदेश काढताना आयोगाने त्या जुन्या यादीतील ९ दस्तऐवज रद्द केले, दुसऱ्या आठांची भर घालून ११ दस्तऐवजांची यादी बनवली आणि केवळ तीच ग्राह्य असल्याचे सांगितले.

आश्चर्य म्हणजे लोकांकडे नक्की असू शकणारी कागदपत्रे आयोगाने यादीतून वगळली आणि मोजक्या लोकांजवळ असतील ती समाविष्ट केली. बिहारातील १८ ते ४० या वयोगटातील व्यक्तींविषयी अधिकृत स्रोतांतून प्राप्त आकडेच खाली दिले आहेत. जुन्या यादीतील तीन प्रमाणपत्रे नव्या यादीत सामील केली गेली: पासपोर्ट (५% पेक्षा कमी लोकांकडे आहे.), जन्मप्रमाणपत्र (२% हून कमी) आणि मॅट्रिक किंवा अन्य पदवीचे प्रमाणपत्र (सुमारे ४३% लोकांकडे उपलब्ध).



या यादीत नव्याने टाकलेल्या कागदपत्रांचे नमुने पाहा: राष्ट्रीय नागरिक सूची (बिहारात उपलब्धच नाही), सरकारी नोकरी ओळखपत्र (१%), वनहक्क पट्टा (नगण्य), कायमस्वरूपी निवास प्रमाणपत्र (बिहारमध्ये मिळत नाही), जातप्रमाणपत्र (१५ ते २०%), जमीन किंवा घर वाटप पत्र (१%) वगैरे वगैरे.

बिहारमधील दीड ते दोन कोटी लोकांकडे यापैकी एकही कागदपत्र नाही. आता आजवर आयोग स्वीकारत आलेल्या, उर्वरित देशात मान्य असलेल्या; पण 'एसआयआर'मधून वगळलेल्या कागदपत्रांवर एक नजर टाकू : बँक पासबुक (७८%), पॅनकार्ड (५६%), मनरेगा रोजगार कार्ड (३४%), ड्रायव्हिंग लायसेन्स (८%) आणि पाच वर्षांपूर्वी मान्य होते ते रेशनकार्ड (६४%) असे दस्तऐवज वगळले आहेत.

निवडणूक आयोग आजवर प्रत्येक नव्या मतदाराकडून आधारकार्ड मागत आलेला आहे. मात्र, 'एसआयआर' मान्य यादीत त्याला स्थान नाही. वस्तुतः आधारकार्ड हा लोकप्रतिनिधी अधिनियम २३ (४) अन्वये मतदार यादीसंदर्भात कायदेशीर मान्यता असलेला एकमेव दस्तावेज.

नाव, वय, आई-वडिलांचे नाव, फोटो आणि निवास अशा अनेकविध गोष्टींचा पुरावा देणाऱ्या मोजक्या प्रमाणपत्रात आधारचा समावेश होतो. आधारकार्ड जवळपास प्रत्येकाकडे असते. (बिहारात एकूण लोकसंख्येपैकी ८८% कडे; परंतु प्रौढांपैकी जवळपास १००% लोकांकडे आधारकार्ड आहे.) म्हणूनच तर व्होटबंदीचे पुरस्कर्ते आधारकार्डाला मान्यता द्यायला मुळीच तयार नव्हते.

आधारकार्ड हा काही नागरिकत्वाचा पुरावा नाही असा निवडणूक आयोगाचा युक्तिवाद होता. कायदेशीर दृष्टीने हे पूर्णपणे खरे आहेच; पण या आयोगाने मान्य केलेले इतर बहुतेक दस्तावेज तरी कुठे नागरिकत्वाचा पुरावा आहेत? सरकारचेच प्रवक्ते एकाएकी आधारविरोधी दुष्प्रचारात गर्क झाले.

बिहारातील काही जिल्ह्यांत लोकसंख्येच्या १४०% आधारकार्ड असल्याचे सांगितले जाऊ लागले. मुस्लिमांची संख्या जास्त असलेल्या सीमावर्ती जिल्ह्यांवर त्यांचा रोख होता. हा धादांत खोटा प्रचार होता. कारण हा आकडा देणाऱ्यांनी लोकसंख्या २०११ च्या जनगणनेतून घेतली होती आणि आधारकार्ड २०२५ ची मोजली होती!

तरीही आधार मान्य न करण्याबाबत आयोग ठाम राहिला. मग मात्र इतर ११ प्रमाणे आधार हा १२ वा पुरावा मानावा असा स्पष्ट आदेश देणे न्यायालयाला भागच पडले. अर्थात इतर पुराव्यांप्रमाणे आधारचीही सत्यता पडताळून पाहण्याची परवानगी न्यायालयाने दिली आहे. एकुणातच 'व्होटबंदी'चा साप पुरता नाही मेला; पण निदान त्याचे दात तरी उपटले गेले. न्यायालयाच्या या आदेशाची निवडणूक आयोग बिहारात योग्य अंमलबजावणी करेल आणि उर्वरित भारतातही त्याचा मान राखून मान्य प्रमाणपत्रात आधारचा समावेश करेल अशी आशा आपण बाळगूया. याउपरही टंगळमंगळ केली तर मात्र हा निवडणूक आयोग मतदारांची नावे वगळण्याच्या राजकीय कटात सामील असल्याचा संशय अधिकच बळावेल.

# ग्राहक मंचांना आदेश अंमलबजावणीचा अधिकार

- **सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय**
- **पाम ग्रोव्ह्स सहकारी गृहनिर्माण सोसायटीचा विजय, ग्राहक व गृहनिर्माण संस्थांना मोठा दिलासा**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

घोरपडी येथील पाम ग्रोव्ह्स सहकारी गृहनिर्माण सोसायटी मर्यादित या संस्थेला सर्वोच्च न्यायालयात मोठा कायदेशीर दिलासा मिळाला आहे. कन्व्हेअन्स डीडच्या अंमलबजावणीसंदर्भात गेली १८ वर्षे सुरू असलेल्या लढाईत सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, ग्राहक मंचांचे सर्व आदेश हे अंमलबजावणीस पात्र असून त्यांना दिवाणी न्यायालयाच्या डिक्रीचा दर्जा आहे. या निर्णयामुळे केवळ कागदी विजय न राहता प्रत्यक्ष दिलासा ग्राहकांना मिळणार असून, १८ वर्षांची कायद्यामधील पळवाट बंद झाली आहे. सोसायटीने बांधकाम व्यावसायिक मे. मगर गिर्मे व गायकवाड असोसिएट्स यांच्या विरोधात ग्राहक मंचात तक्रार दाखल केली होती. बांधकाम व्यावसायिकांनी कन्व्हेअन्स डीड नोंदणीस टाळाटाळ केल्याने जिल्हा ग्राहक मंचाने सोसायटीच्या बाजूने निर्णय देत अंमलबजावणीचे आदेश दिले. मात्र, राज्य ग्राहक आयोगाने जिल्हा मंचाला अशा आदेशांचा अधिकार नसल्याचे सांगत आदेश रद्द केला.



सोसायटीने हा निर्णय सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिला. न्यायमूर्ती जे.के. महेश्वरी व न्यायमूर्ती राजेश बिंदल यांच्या खंडपीठाने राज्य आयोगाचा निर्णय रद्द करून ग्राहक मंचांच्या अधिकारावर शिक्कामोर्तब केले.

२००२ मधील दुरुस्तीनंतर ग्राहक मंचांना फक्त अंतरिम आदेश अंमलबजावणी करता येतील, अशी चुकीची व्याख्या प्रचलित झाली होती.

२०१९ मध्ये ही त्रुटी कायद्यात सुधारली असली तरी त्याचा फायदा ग्राहकांना मिळत नव्हता.

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, ग्राहक मंचांचे कोणतेही आदेश अंमलबजावणीस पात्र आहेत.

सोसायटीच्या वतीने अधिवक्ता सत्यविक्रम जगताप आणि लेखा जी. व्ही. यांनी बाजू मांडताना, "ग्राहक मंचांचे आदेश जर अंमलात आणता येत नसतील, तर लाखो ग्राहक न्यायापासून वंचित राहतील," असे स्पष्ट केले.

ॲटर्नी जनरल आर. वेंकटरमणी यांनीदेखील २००२ च्या दुरुस्तीमुळे निर्माण झालेल्या गंभीर अडचणींकडे न्यायालयाचे लक्ष वेधले.

२०२० ते २०२४ दरम्यान देशभरात ५६,५७८ अंमलबजावणी अर्ज प्रलंबित असल्याचे अधोरेखित करत, न्यायालयाने राष्ट्रीय ग्राहक आयोगाला अशा प्रकरणांचा जलद निपटारा करण्याचे निर्देश दिले आहेत.

या निर्णयामुळे गृहनिर्माण सोसायट्या व फ्लॅट खरेदीदारांना कन्व्हेअन्स डीड नोंदणीस मोठा दिलासा मिळणार आहे. बांधकाम व्यावसायिकांना जुन्या कायद्याचा चुकीचा आधार घेता येणार नाही, असे पाम ग्रोव्ह्स सहकारी गृहनिर्माण सोसायटीने नमूद केले आहे.

## पुणे-अहिल्यानगर उड्डाणपूल व विठ्ठलवाडीपर्यंत मेट्रो प्रकल्पाला गती

- **लवकरच उच्चस्तरीय बैठक**


**वाघोली (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहर व ग्रामीण भागातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या पुणे-अहिल्यानगर उड्डाणपूल प्रकल्पासह विठ्ठलवाडीपर्यंत मेट्रोविस्तार या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना गती मिळणार आहे. शिरूर हवेलीचे आमदार आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी याबाबत पत्रव्यवहार केला असून येत्या काही दिवसांत सर्व संबंधित शासकीय विभागांची समन्वय बैठक पालकमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. या बैठकीसाठी पुणे महानगरपालिका, नॅशनल हायवे प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, पीएमआरडीए, एमएसआयडीसी आणि महा मेट्रो अशा महत्त्वाच्या विभागांना बोलावण्यात येणार आहे. या बैठकीतून प्रकल्पासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया व टेंडर अंतिम करून पुढील आठ ते दहा महिन्यांत प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. वाहतूक कोंडीमुळे शिरूर व हवेली तालुक्यातील नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असून, ग्रामीण भागातील औद्योगिक विकासालाही अडथळा येत आहे. या प्रकल्पांची कामे मार्गी लागल्यास केवळ पुणे शहरच नव्हे तर ग्रामीण भागातील हजारो नागरिकांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आमदार कटके यांनी या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करून व बैठका घेऊन पाठपुरावा केला आहे.

# प्रभाग इच्छुकांमध्ये धामधूम

## थोडेसे बदल वगळता प्रारूप रचना अंतिमच ठरण्याची शक्यता





**ज्ञानेश्वर जाधव, विशेष प्रतिनिधी, पुणे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या प्रभाग रचनेबाबत राजकीय वातावरण तापले आहे. नुकतीच प्रसिद्ध झालेली प्रारूप प्रभाग रचना जाहीर होताच इच्छुक उमेदवारांमध्ये धावपळ सुरू झाली आहे. प्रभागाच्या मर्यादा, मतदारसंख्या आणि आरक्षणाच्या बदलामुळे अनेकांचे गणित कोलमडले असून नवे समीकरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, हरकती व सुनावणीची प्रक्रिया सुरू असली तरी फारसे बदल होण्याची शक्यता नसल्याची माहिती सूत्रांकडून समजते. म्हणजेच सध्या जाहीर झालेली प्रारूप रचना हीच अंतिम ठरण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे उमेदवार आणि पक्षांनी आपले डावपेच आता याच प्रभाग रचनेनुसार आखण्याची तयारी सुरू केली आहे.

स्थानिक पातळीवर या रचनेविरोधात काही भागातून नाराजी व्यक्त होत असली तरी, बहुतांश ठिकाणी पक्षांतर्गत गटबाजी वाढली आहे. इच्छुक उमेदवारांना प्रभागात स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी मोठी कसरत करावी लागणार आहे. ज्या ठिकाणी आरक्षण बदलले आहे तिथे तर नेत्यांच्या चांगल्याच धावपळीला सुरुवात झाली आहे.

राजकीय जाणकारांच्या मते, या रचनेमुळे काही प्रभागात नवे चेहरे संधीच्या उंबरठ्यावर आहेत, तर काही अनुभवी नगरसेवकांना गळतीचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे निवडणुकीच्या तोंडावर राजकीय समीकरणे अधिक गुंतागुंतीची होणार आहेत.

बालगंधर्व रंगमंदिर येथे सुनावणी होत असून प्रभाग रचनेवरून कभी खुशी कभी गम अशीच अवस्था इच्छुकांची झाल्याचे दिसून आले.

# पत्रकारितेवरील हल्ले थांबवा

- **अन्यथा लोकशाही पद्धतीने तीव्र आंदोलन छेडू!"**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लोकशाहीचा चौथा स्तंभ पत्रकार असून या घटकावर वारंवार अन्याय होत असून गेल्या काही दिवसापासून पुणे शहरासह राज्यात पत्रकारितेवरील हल्ले समोर आले आहेत.राज्यभरात ६ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या गणेश विसर्जन मिरवणुकांदरम्यान पत्रकारांवर झालेले हल्ले हा लोकशाहीतील चौथ्या स्तंभावर थेट आघात आहे. पुणे शहरात दरवर्षी वार्तांकन आणि छायाचित्रण या महत्त्वाच्या गोष्टी पत्रकार करत असतात.अगदी पहिल्या दिवसापासून तरीही २०२५ च्या विसर्जन मिरवणुकीत आपले कर्तव्य बजावताना एका छायाचित्रकाराला ताल वाद्य पथकातील वादकांकडून धक्काबुक्की झाली,तर एका महिला पत्रकारांना ढकलून लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करण्यात आले. तसेच मुंबई येथे साम टीव्हीचे वार्ताहर विकास मिरगणे यांना सहाय्यक पोलीस निरीक्षक शांताराम आबाजी नाईक यांनी कानशिलात मारणे हा संतापजनक प्रकार आहे.आम्ही पुणे डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना याचा तीव्र निषेध करतो. अशा घटनांवर तात्काळ कडक कायदेशीर कारवाई व्हावी, ही आमची ठाम मागणी आहे.तसेच, नुकत्याच झालेल्या सिंहगड रस्त्यावरील उड्डाणपुलाच्या उद्घाटनावेळी पत्रकारांना अधिकृत निमंत्रण देऊनही त्यांच्यावर पोलिसांकडून धक्काबुक्की, अडथळे, फोटो-व्हिडिओ घेण्यास मनाई करण्यात आली. ही वर्तणूक निंदनीय आहे.पत्रकारांवर होत असलेल्या हल्ल्यांमध्ये वाढ होत असून हा प्रकार लोकशाहीस घातक आहे. पत्रकार हा जनतेचा आवाज आहे. त्यांना गप्प बसवण्याचा प्रयत्न हा कधीही सहन केला जाणार नाही. भविष्यात पुन्हा असे हल्ले,अडथळे, गैर प्रकार झाले तर डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना तीव्र आंदोलनाचा मार्ग अवलंबेल,असा इशारा,डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघाने दिला आहे,यावेळी श्रमिक पत्रकार संघातील पत्रकार बांधव देखील उपस्थित होते.

**संबंधित ढोल ताशा पथकावर गुन्हा देखील दाखल झाला आहे तसेच आयुक्तांनी पत्रकार व पोलीस यांची एक संयुक्त समिती गठीत करून शहरांमध्ये विविध ठिकाणी होणारे कार्यक्रम,सभा,उत्सव याची आखणी एकत्रितपणे करून पत्रकार बांधवांना वार्तांकन करणे सोपे जाईल या दृष्टीने सूचना देखील पत्रकार बांधवांना दिल्या.**

डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघातर्फे ॲड.अमोल पाटील राज्य संघटक,महेश टेळे अध्यक्ष पुणे शहर,विजय रणदिवे कार्याध्यक्ष,पराग डिंगळकर कार्याध्यक्ष,दिनेश वढणे सरचिटणीस,रोहित दळवी सचिव,शिवाजी हुलवळे संघटक ,मुकेश वाडकर कार्यकारणी सदस्य यांच्या उपस्थितीत पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना पुणे शहर पोलीस आयुक्तालय या ठिकाणी पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी निवेदन देण्यात आले. यावेळी पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पत्रकारांच्या शिष्टमंडळाची बाजू ऐकून घेऊन पुन्हा असा प्रकार होणार नाही याची ग्वाही देत,पत्रकारांना सकारात्मक प्रतिसाद दिला.



**देशसेवा फाऊंडेशन व लायन्स कराटे क्लब पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने**

# कराटेवीरांचा भव्य सत्कार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

देशसेवा फाऊंडेशनचे संस्थापक व पुणे सत्ता वृत्तपत्राचे संपादक श्री. नरेंद्र पारखे सर व लायन्स कराटे क्लब पुणेचे प्रशिक्षक ओमकार पारखे सर, शिवराज जेजुरे सर, मारुती जाधव सर, सुरज पवार सर, धवल पारखे सर व शितल समिंदर मॅडम यांच्या संयुक्त विद्यमानाने केएआय राष्ट्रीय कराटे चॅम्पियनशिप २०२५ मध्ये पदक मिळवलेल्या तसेच सहभाग नोंदवलेल्या खेळाडूंचा भव्य सत्कार समारंभ उत्साहात व थाटामाटात पार पडला. या स्पर्धेत शौर्य सुधाकर जाधव याने १२ वर्षे वयोगटात सुवर्णपदक पटकावून महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले. तसेच स्वराज वाल्हेकर, समर्थ गायकवाड, पियू जगताप, गणेश किल्लेदार व शैलेश शिर्गिरे यांनी उत्कृष्ट खेळ करत राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेऊन महाराष्ट्र राज्याचा लौकिक वाढवला.

शौर्य जाधवचे वडील सुधाकर जाधव यांनी सांगितले की, शौर्यच्या या यशामागे प्रशिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन व कठोर मेहनत मोठा वाटा आहे. त्यांनी सर्व पालक व उपस्थित मान्यवरांचे मनःपूर्वक आभार मानले व सर्व खेळाडूंना पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या. शौर्यच्या पुढील वाटचालीसाठी त्यांनी आशावादी भविष्य व्यक्त केले.

# थोडक्यात



## डॉल्बी-डीजे बंदीच्या मागणीसाठी कलावंत ट्रस्टची स्वाक्षरी मोहीम

पुणे (आरंभ पर्व) : सार्वजनिक उत्सवांतील मिरवणुका, शोभायात्रांमध्ये वाढत्या डॉल्बी, डीजे, स्पीकर भिंतींच्या वापरामुळे नागरिकांना होणारा त्रास, वाहतूक कोंडी आणि ध्वनीप्रदूषणाच्या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी कलावंत ट्रस्टतर्फे स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येणार आहे. ही मोहीम येत्या १४ सप्टेंबर २०२५, रविवार रोजी सकाळी ९ वाजल्यापासून बालगंधर्व रंगमंदिर प्रांगण, पुणे येथे होणार असून, संकलित स्वाक्षऱ्या व निवेदन मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे सादर करण्यात येणार आहेत.

निवेदनातील प्रमुख मागण्या : धार्मिक व सांस्कृतिक मिरवणुका, तसेच महापुरुषांच्या जयंती/पुण्यतिथी निमित्त निघणाऱ्या मिरवणुकांमध्ये डॉल्बी/डीजे व तत्सम मोठ्या ध्वनीप्रणालींना सक्त मनाई करावी.
स्थानिक रहिवाश्यांचा त्रास, शारीरिक हानी (उदा. बहिरेपणा), वाहतूक कोंडी टाळण्यासाठी कडक नियमावली तयार करावी.
मिरवणुकांमध्ये पारंपरिक वाद्य आणि कलाप्रकारांना प्रोत्साहन द्यावे.

डिजिटल सुविधा : ज्या नागरिकांना प्रत्यक्ष येऊन स्वाक्षरी करणे शक्य नाही त्यांच्यासाठी Digital Petition साइन करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार असून, यासाठीची लिंक मोहिमेच्या दिवशी प्रसिद्ध केली जाईल. कलावंत ट्रस्टने नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी होऊन या मोहिमेला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे.

## 'शिक्षा नेतृत्व सन्मान २०२५' परिषदेला मिळाला उस्फुर्त प्रतिसाद



पुणे (आरंभ पर्व) : अनंत नेशनल यूनिवर्सिटी ने अलीकडेच पुण्यातील हॉटेल प्रेसिडेंट येथे 'शिक्षा नेतृत्व सन्मान २०२५' या शीर्षकांतर्गत प्राचार्य परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेत डी. वाय. पाटील इंटरनॅशनल स्कूल, पुणे; दिल्ली पब्लिक स्कूल, पुणे ; अपीजे स्कूल, मुंबई; अक्षरा इंटरनॅशनल स्कूल, पुणे; बिल्लाबोंग हाय इंटरनॅशनल स्कूल, मुंबई आणि आयकॉन पब्लिक स्कूल, पुणे यासारख्या मुंबई आणि पुण्यातील आघाडीच्या सर्वोत्तम शाळांमधील उत्कृष्ट शिक्षकांना एकत्र आणले गेले, ज्यामुळे त्यांना शिक्षकांच्या परिवर्तनकारी भूमिकेशी जोडण्यासाठी, अंतर्दृष्टीची देवाणघेवाण करण्यासाठी आणि त्यांचे कौतुक करण्यासाठी एक व्यासपीठ मिळाले. पुणे आणि मुंबईतील ६५ हून अधिक प्रतिष्ठित मुख्याध्यापक आणि शिक्षकांना त्यांच्या उल्लेखनीय प्रवास आणि अमूल्य योगदानाबद्दल परिषदेत सन्मानित करण्यात आले. त्यांनी शैक्षणिक नेतृत्व, नवोपक्रम आणि भविष्यातील पिढ्यांना तयार करण्यात शाळांची विकसित होत असलेली भूमिका यावर अर्थपूर्ण चर्चा केली. या उपक्रमाद्वारे, अनंत नेशनल यूनिवर्सिटीतर्फे सर्वसमावेशक प्रगतीसाठी शिक्षण क्षेत्रातील आघाडीच्या संस्थांना एकत्र आणण्याचा आणि विकसित भारताच्या उभारणीत शिक्षणाची भूमिका मजबूत करण्यासाठी सामूहिक कृतीला प्रेरित करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## सरचिटणीसपदी कमलेश काळभोर



लोणी काळभोर (आरंभ पर्व) : पुणे - सोलापूर रोड मंडल कार्यकारिणीच्या सरचिटणीसपदी कमलेश दत्तात्रय काळभोर तर उपतालुका अध्यक्षपदी मनोज काळभोर यांची नियुक्ती करण्यात आली .भाजप पुणे जिल्हा उत्तरचे अध्यक्ष प्रदीप कंद यांच्या हस्ते नियुक्तीचे पत्र देण्यात आले. निवडीनंतर बोलताना कमलेश काळभोर यांनी सांगितले की पक्षाची ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पर्यंत पोहोचवण्यासाठी व पक्ष संघटना वाढीसाठी काम करणार आहे . याप्रसंगी पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुदर्शन चौधरी,जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रवीण काळभोर, महाराष्ट्र प्रदेश व्यापार आघाडीचे विकास जगताप, पुणे जिल्हा महिला मोर्चाचे अध्यक्ष पूनम ताई चौधरी, महाराष्ट्र प्रदेश क्रीडा आघाडीचे पै. संदीप भोंडवे, विजय जाचक,अजिंक्य कांचन, श्रीकांत कांचन, पूजा सणस, आदी मान्यवर उपस्थित होते, निवडीनंतर सर्वच थरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## थोडक्यात

### डॉ. तरंगे गजेंद्र यांना 'कोचिंग क्लास एक्सलन्स अवॉर्ड'




पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्र राज्यस्तरीय EDUCONTECH-25 परिषदेत Education-Content-Technology-AI Integration & Business या विषयावर अलीकडेच भव्य परिषद पार पडली. या परिषदेत राज्यातील विविध शिक्षणतज्ज्ञ व संस्था प्रमुखांना त्यांच्या कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. यामध्ये डॉ. तरंगे गजेंद्र (DR TARANGE SIR SHREE ONLINE CLASS PVT LTD) यांना "Coaching Class Excellence Award" हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान Ajeenkya D. Y. Patil University (The Innovation University) व ADDONS-i (All Digital Data & Online Solutions for Institute) यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात आला. डॉ. तरंगे सरांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या अध्यापन पद्धती, विद्यार्थ्यांशी असलेले संवाद व सततची शैक्षणिक गुणवत्ता यामुळे त्यांच्या वर्गाने राज्यात वेगळी छाप पाडली आहे. या यशाबद्दल त्यांचे सहकारी, विद्यार्थी व पालकवर्गाकडूनही अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### हडपसर ते दिवेघाट मार्ग सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद

पुणे (आरंभ पर्व) : आळंदी ते पंढरपूर पालखी महामार्गांतर्गत हडपसर ते दिवेघाट यादरम्यान रस्ता रुंदीकरणाचे काम राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत सुरू आहे. या कामासाठी खडकात ब्लास्टिंग करण्याची आवश्यकता असल्याने पोलिस प्रशासनाच्या देखरेखीखाली ब्लास्टिंगचे काम करण्यात येत आहे. त्यामुळे शुक्रवारी (ता. १२) सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत दिवेघाटातील वाहतूक बंद राहणार आहे. दोन्ही बाजूंनी प्रवास करणाऱ्या वाहनधारकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन प्राधिकरणाकडून करण्यात आले.




# पुण्यात प्रभागरचना सुनावणीत गोंधळ



पुणे (दै. आरंभ पर्व)
आगामी महापालिका निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या प्रारूप प्रभागरचनेवर हरकती, सूचना नोंदविणाऱ्यांमध्ये सत्ताधारी भाजपच्या कार्यकर्त्यांचा समावेश अधिक असल्याचे सुनावणीदरम्यान दिसून आले.

कसबा विधानसभा मतदारसंघातील एका प्रभागाचे तीन तुकडे केल्याने येथील आरक्षण धोक्यात आल्याचा दावा सुनावणीमध्ये काही कार्यकर्त्यांनी केला. दरम्यान पहिल्या दिवशीच्या सुनावणीमध्ये २ हजार ९२० इतक्या हरकती, सूचना सुनावणीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. त्यासाठी सुमारे ५४० हरकतदारांनी उपस्थिती लावली.

महापालिकेने तयार केलेल्या प्रारूप प्रभागरचनांवर घेण्यात आलेल्या हरकतींवर सुनावणी घेतली जात आहे. दोन दिवस ही सुनावणी चालणार आहे. प्रभाग क्रमांक एक ते २१ या प्रभागांमधील हरकतींवर सुनावणी घेण्यात आली. सामान्य प्रशासन विभागाच्या अपर सचिव व्ही. राधा यांनी ही सुनावणी घेतली. महापालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, निवडणूक निर्णय अधिकारी प्रसाद काटकर यावेळी उपस्थित होते.

प्रभागरचना करताना भौगोलिक तसेच नैसर्गिक सीमारेषा बदलण्यात आल्या आहेत. काही प्रभागांमध्ये आरक्षण बदलण्यासाठी सोयीस्करपणे लोकसंख्येचे विभाजन केले गेले आहे, असा आरोप सुनावणीमध्ये करण्यात आला. प्रशासनाने गेल्या अनेक वर्षांपासून असलेले आरक्षण बदलावे, यासाठी प्रभाग क्रमांक २४ कमला नेहरू हॉस्पिटल – रास्ता पेठचे तीन तुकडे केल्याचा आरोप करण्यात आला. हरकतींवर सुनावणी होत असताना सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करा, अशा घोषणा दिल्या. या प्रकारामुळे काही काळ सुनावणीच्या ठिकाणी गोंधळाचे वातावरण झाले.

सुनावणीचा पहिला दिवस सुरळीत पार पडल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

उर्वरित प्रभागातील हरकती, सूचनांवर जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार सुनावणी होणार असल्याचे उपायुक्त काटकर यांनी सांगितले.

दरम्यान, पुणे महापालिकेच्या वतीने गुरुवारी घेण्यात आलेल्या प्रभागांच्या सुनावणीसाठी २ हजार ९२० हरकती आल्या होत्या. त्यापैकी प्रत्यक्षात ५४० हरकतधारकांनी सुनावणीसाठी हजेरी लावली. यामध्ये प्रभाग क्रमांक २४ कमला नेहरू हॉस्पिटल-रास्ता पेठचे सर्वाधिक म्हणजे ८५ हरकती नोंदविणारे उपस्थित होते.

## 'आपला कसबा कुठंय?'

बालगंधर्व रंगमंदिर येथे सुरू असलेल्या प्रभागांच्या हरकतींच्या सुनावणीच्या वेळी माजी आमदार रवींद्र धंगेकर यांचे पुत्र प्रणव धंगेकर यांनी 'आपला कसबा कुठंय?' असा फलक सभागृहात झळकावत भावना व्यक्त केल्या. प्रभागरचना करताना राजकीय द्वेष भावनेतून चुकीच्या पद्धतीने आणि नियमांचे उल्लंघन करण्यात आल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. कसबा हा पारंपरिक प्रभाग आहे. यापूर्वी झालेल्या निवडणुकांत कसब्याचे अस्तित्व कायम होते. मात्र, या नवीन प्रभागरचनेमध्ये कसब्याचे नावदेखील गायब करण्यात आले आहे. यामागे राजकीय षडयंत्र आहे, अशी भावना अधिकाऱ्यांसमोर प्रणव धंगेकर यांनी व्यक्त केली.



## पूना क्लब गोल्फपटूंच्या कामगिरीचा उत्सव

- व्यावसायिक, हौशी, ज्युनियर आणि कॅडीजचा गौरव

पुणे (दै. आरंभ पर्व)
पूना क्लब गोल्फ कोर्सने त्यांच्या उत्कृष्ट गोल्फपटूंच्या कामगिरीचा आनंद साजरा करत व्यावसायिक, हौशी, ज्युनियर तसेच कॅडीजना विशेष सन्मानित करण्याचा निर्णय घेतला आहे. मंगळवारी क्लबकडून अधिकृत घोषणा करण्यात आली.

गोल्फ कॅप्टन जय शिर्के म्हणाले, "पुरुष, महिला आणि हौशी सर्किटमधील विविध यश पूना क्लबमधील प्रतिभेची खोली दाखवते."

क्लबचे अध्यक्ष गौरव गाढोके यांनी सांगितले की, "आमच्या व्यावसायिकांची प्रतिभा आणि हौशींची वचनबद्धता पूना क्लबच्या गोल्फ संस्कृतीची ताकद अधोरेखित करते. त्यांच्या कामगिरीमुळे आमच्या क्लबला राष्ट्रीय स्तरावर गौरव मिळाला आहे."

लेडी गोल्फ कॅप्टन पद्मजा शिर्के यांनी तरुण महिला गोल्फपटूंच्या यशावर भर देत सांगितले, "अनन्या आणि मन्नतसारख्या गोल्फपटूंचा उदय विशेष आनंददायी आहे. त्यांच्या प्रवासाला आम्ही सर्वतोपरी साथ देऊ."

## पुणेकरांचा पीएमपीएमएल बसेससाठी वाढता आक्रोश

**महेश वरवटे**




पुणे (दै. आरंभ पर्व)
पुणे शहरात पीएमपीएमएल बससेवेवर अवलंबून असलेल्या लाखो प्रवाशांची गैरसोय दिवसेंदिवस वाढत चालली आहे. सकाळी व संध्याकाळी ऑफिस-शाळा-कॉलेजच्या गर्दीच्या वेळेत नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. बस थांब्यांवर लांबलचक रांगा लागतात, तर अनेकदा जागा न मिळाल्याने प्रवासी बसमध्ये चढूही शकत नाहीत. परिणामी, प्रवाशांना पुढील बसची प्रतीक्षा करावी लागते आणि त्यांच्या वेळापत्रकाचा बोजवारा उडतो.

शहरातील वाढती लोकसंख्या, वाहतूक कोंडी आणि वाढते पेट्रोल-डिझेलचे दर पाहता अधिकाधिक नागरिक सार्वजनिक वाहतुकीकडे वळत आहेत. मात्र, सध्याच्या बसेसची संख्या ही प्रवाशांच्या तुलनेत अपुरी पडत असल्याने बससेवा कोसळल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

काही नागरिकांनी सांगितले की – "सकाळी ऑफिसला जाण्यासाठी दोन-तीन बसेस सोडाव्या लागतात. बसमध्ये चढलो तरी उभे राहायलाही जागा मिळत नाही. लहान मुलं व महिलांसाठी ही परिस्थिती अत्यंत धोकादायक आहे."

"पुण्यात मेट्रो आली असली तरी ती मर्यादित मार्गावर आहे. शहराच्या बहुसंख्य भागांसाठी अजूनही पीएमपीएमएलवरच अवलंबून रहावं लागतं. त्यामुळे बसेसची संख्या वाढवणं हाच पर्याय आहे."

दरम्यान, वाहतूक तज्ञांचे म्हणणे आहे की, जर वेळेवर पुरेशा बसेस सोडल्या गेल्या तर केवळ प्रवाशांची गैरसोय कमी होणार नाही, तर खाजगी वाहनांचा वापरही कमी होईल. यामुळे वाहतूक कोंडी आणि प्रदूषणावरही नियंत्रण येऊ शकते.

नागरिकांच्या या तीव्र आक्रोशाला प्रतिसाद देत पीएमपीएमएल प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अधिक बसेस रस्त्यावर आणाव्यात, तसेच विद्यमान बसेसची दुरुस्ती करून नियमित फेऱ्या सुरू ठेवाव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

पुणेकरांची अपेक्षा आहे की, लवकरच उपाययोजना झाल्यास प्रवाशांचा त्रास कमी होऊन पीएमपीएमएलची सेवा पुन्हा एकदा विश्वासार्ह ठरेल.

## सिंहगड रस्त्यावर आपटे कॉलनीसमोर दुभाजक बसविण्याची ॲड. प्रसन्नदादा जगताप यांची मागणी

हिंगणे (दै. आरंभ पर्व)
सिंहगड रस्त्यावरील हिंगणे खुर्द येथे नव्याने बांधलेल्या उड्डाणपुलाखाली आपटे कॉलनीसमोर नागरिकांना सुरक्षितपणे रस्ता ओलांडता यावा यासाठी दुभाजक बसविण्याची मागणी माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी केली आहे. या भागामध्ये जेष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी तसेच नोकरदार वर्गाला रस्ता ओलांडताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. सध्या नागरिकांना दूरवरून वळसा घालून यावे लागत असल्याने मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे आपटे कॉलनीसमोर पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी दुभाजकाची तातडीने आवश्यकता असल्याचे ॲड.जगताप यांनी स्पष्ट केले.

त्यांनी पुढे सांगितले की, रस्त्यावरून वारंवार वेगाने वाहने धावत असल्याने अपघातांचा धोका देखील निर्माण झाला आहे. प्रशासनाने तात्काळ उपाययोजना केल्यास नागरिकांचा जीवितास धोका कमी होईल व प्रवास अधिक सुरक्षित होईल. यावेळी त्यांनी स्थानिक रहिवाशांसह जागेची पाहणी करून पालिका प्रशासनाकडे मागणी केली. या पाहणीवेळी रहिवासी दिलीप येवलेकर, गणेश चौधरी, राजेंद्र जगताप, किशोर कुलकर्णी, सुनील जोरे, राहुल जोशी, सर्वज्ञ परदेशी, सुनील महांगरे आदी उपस्थित होते.

**• धोका •**

**वेगाने जाणारी वाहने.**

**अपघाताची शक्यता वाढली आहे.**

**• उपाययोजना आवश्यकता •**

**दुभाजक तातडीने बसवावा; जीवितास धोका कमी, प्रवास सुरक्षित.**




## सारोळे गावात एकता ग्रुपची जंगी गणेश मिरवणूक

**हजारो भक्तांचा उत्स्फूर्त सहभाग**

- सारोळे येथील मिरवणूक बार्शी तालुक्यातील ऐतिहासिक ठरली

सारोळे (दै. आरंभ पर्व)
गणेशोत्सवानिमित्त सारोळे येथे एकता ग्रुप सामाजिक संस्था आयोजित गणेशोत्सव मंडळाची जंगी व पारंपरिक मिरवणूक मोठ्या उत्साहात पार पडली. गावातील प्रमुख मार्गांनी निघालेल्या या भव्य मिरवणुकीत हजारो गणेशभक्तांनी सहभाग नोंदवला. संपूर्ण सारोळे गाव भक्तिभाव व जल्लोषाने दुमदुमून गेले.

मिरवणुकीत पारंपरिक लेझीम पथकाचे तालबद्ध सादरीकरण, ढोल-ताशांचा गजर, हलगी वादकांची साथ यामुळे वातावरण दणाणून गेले. लहान मुलांसाठी खास टेडी शो हा आकर्षणाचा विषय ठरला. तसेच कुर्डूवाडी येथील बँजो पथकाच्या सुरेल सुरांनी भक्तीमय वातावरण अधिक रंगतदार झाले.

संस्थापक बाळराजे गाटे यांच्या नेतृत्वाखाली ही मिरवणूक झोपडपट्टी येथून निघाली. गावातील प्रमुख मार्गांनी फिरत एकता चौक, वेताळनगरी, सारोळे येथे मोठ्या उत्साहात समाप्त झाली. मार्गभर भक्तांच्या जयघोषाने आणि फुलांच्या सजावटीने गाव गणेशमय झाले होते.

यावेळी नुकतेच दुखद निधन झालेल्या स्व. धोंडीराम भोसले यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मुंबई येथील मराठा आरक्षण आंदोलनामध्ये सक्रिय सहभाग घेणारे भारत कुराडे यांचा बळीनाना गाटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.




मिरवणुकीनंतर मंडळाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. चोख व्यवस्थापन आणि भक्तीमय वातावरणामुळे उपस्थितांनी एकता ग्रुपचे मनापासून कौतुक केले.

"एकता ग्रुपने नेहमीच पारंपरिक मिरवणुकीला प्राधान्य दिले आहे. गावातील संस्कृती, भक्तिभाव आणि एकोपा वृद्धिंगत करण्यासाठी यापुढेही अशीच भव्य मिरवणूक आयोजित केली जाईल," असे उद्गार संस्थापक बाळराजे गाटे यांनी काढले.

या मिरवणुकीस आधारस्तंभ किरण गाटे, माजी सैनिक अमित भोसले,प्रकाश गाटे, सामाजिक कार्यकर्ते बालाजीभाऊ निचळ, ॲड, बबिता काळे, मोहनअण्णा गाटे,अध्यक्ष धीरज गाटे, उपाध्यक्ष विनोद डोके, खजिनदार सयाजी चौधरी, अनिकेत गाटे ,पंढरी भोसले, बाळासाहेब गाटे, कमलाकर पाटील,संतोष साबळे, ग्रामपंचायत सदस्य संदीप साबळे, श्री. चंद्रकांत साबळे, अरुण पाटील,सुशांत काकडे, भुजंग गाटे, कल्याण पाटील, अंकुश गाटे , विपिन गाटे, देवानंद शिंदे,आबा गाटे ,महेश मुंबरे यांच्यासह मंडळाचे कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## थोडक्यात




### अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाची मोठी झेप : उपक्रमांची घोषणा

पुणे (आरंभ पर्व) : अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाने (ADYPU) आपल्या नॉलेज सिटी कॅम्पसमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत शैक्षणिक, संशोधन आणि नवोपक्रम क्षेत्रातील अनेक भव्य कामगिरीची घोषणा केली. विद्यापीठाला नुकतेच NAAC कडून 'अ' श्रेणी मानांकन मिळाले असून, स्कूल ऑफ इंजिनिअरिंगला NIRF २०२५ मध्ये २०१-३०० बँडमध्ये स्थान प्राप्त झाले आहे. एमबीए अभ्यासक्रमाला NBA मान्यता मिळाली आहे. विद्यापीठाचे कुलपती डॉ. अजिंक्य डी. वाय. पाटील यांना त्यांच्या नेतृत्व आणि समाजसेवेसाठी 'भारत भूषण' पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच, ADYPU ला ९२% ट्रस्ट इंडेक्स स्कोअरसह 'ग्रेट प्लेस टू वर्क®' प्रमाणपत्र मिळाले आहे.




### वडगाव धायरीत सेवा सप्ताह उत्साहात

- आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रमांची मेजवानी

वडगाव (आरंभ पर्व) : खडकवासला विधानसभेचे आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रमांची परंपरा यंदाही वडगाव धायरी परिसरात जपली गेली. माजी नगरसेवक हरिदास चरवड यांच्या पुढाकारातून 23 ऑगस्ट ते 1 सप्टेंबर 2025 या कालावधीत सेवा सप्ताह आयोजित करण्यात आला. या सेवा सप्ताहाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ औपचारिक कार्यक्रम न करता प्रत्यक्ष लोकांना लाभ मिळेल अशा उपक्रमांवर भर देण्यात आला. आरोग्य तपासणी शिबिर, विविध शासकीय योजनांची माहिती व नोंदणी शिबिर, वृद्धाश्रमातील ज्येष्ठांना फळवाटप, तसेच महिलांसाठी चारचाकी वाहन प्रशिक्षण शिबिर अशा उपक्रमांनी सर्व स्तरांतील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळवला. यावेळी परिसरातील ज्येष्ठ नेते व पदाधिकारी उपस्थित राहून कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला. यात बाळासाहेब पोकळे, माजी नगरसेवक बाळासाहेब नवले, धनंजय पोकळे, भाजपा वडगाव धायरी मंडलाचे अध्यक्ष यशवंत लायगुडे, अनिल चरवड, युवा मोर्चाचे सारंग नवले, अनिल मते, सुहास पवार, चंद्रकांत पवळे, केदार जाधव आदी मान्यवरांचा समावेश होता. या सेवा सप्ताहातून केवळ वाढदिवस साजरा करण्यापेक्षा 'सेवेतूनच आनंद' हा संदेश समाजात पोहोचल्याचे उपस्थितांनी नमूद केले.



### देश सेवा फाऊंडेशन तर्फे लघु उद्योजकांसाठी मार्गदर्शन मेळावा

पुणे (आरंभ पर्व) : देश सेवा फाऊंडेशन तर्फे लघु उद्योजकांसाठी मार्गदर्शन मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्याचे आयोजन देश सेवा फाऊंडेशनचे नरेंद्र पारखे यांनी केले होते. मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून आनंद जेठे, सौ. दिपाली जेठे, आनंदा ओव्हाळ, अवचरे, किशोर भालके, सुनील कांबळे आणि भरत घोडके उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून जेठे अकॅडमीचे संचालक प्राध्यापक आनंद जेथे व प्राध्यापक दिपाली जेठे यांनी लघु उद्योजकांना व्यवसायातील विविध संधी, आर्थिक नियोजन, बाजारपेठेतील आव्हाने आणि त्यावर मात करण्याचे उपाय याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास उपस्थित उद्योजकांनी या उपक्रमाचे स्वागत केले व भविष्यात अशा मार्गदर्शन मेळाव्यांची अपेक्षा व्यक्त केली.

### राजगुरुनगर आगारात नवीन एसटी बसगाड्या दाखल

- प्रवाशांची गैरसोय दूर होणार

राजगुरुनगर (आरंभ पर्व) : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून येथील राजगुरुनगर एसटी आगारात पंधरा नवीन बसगाड्या उपलब्ध झाल्या आहेत. आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते नव्या अत्याधुनिक लालपरी बसगाड्यांचे पूजन करण्यात आले. नव्या बसगाड्यांचे आगमन हे राजगुरुनगर परिसरातील प्रवाशांसाठी दिलासादायक ठरणार आहे. यावेळी बोलताना आगारव्यवस्थापक उज्वला कुटे म्हणाल्या, वाहतूक व यांत्रिक विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी बसगाड्यांची गरज अधोरेखित करत मागणी प्रस्ताव महामंडळाकडे सादर केला होता. या प्रस्तावावर तात्काळ कार्यवाही करत व आमदार बाबाजी काळे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत शासनाने राजगुरुनगर आगारासाठी एकूण वीस नव्या बसगाड्या उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. त्यापैकी पंधरा आधुनिक बसगाड्या आगारात दाखल झाल्या आहेत. यामुळे अधिक चांगली सेवा प्रवाशांना देता येईल. आमदार बाबाजी काळे म्हणाले, राजगुरुनगर एसटी आगारात नव्याने दाखल झालेल्या बसगाड्यांचे लोकार्पण करताना विशेष आनंद होत आहे.

# महापौर आरक्षण निश्चितीच्या प्रक्रियेला वेग

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

आगामी महापालिका निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागरचना प्रसिद्ध झाल्यानंतर आता महापौरपदाच्या आरक्षण निश्चितीच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. शहरातील लोकसंख्या, महापौर आरक्षण लागू झाल्यापासूनचा आरक्षणाचा तपशील पिंपरी-चिंचवड महापालिकेने राज्य शासनाला पाठविला आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये महापौरपदासाठी सर्व प्रवर्गासाठीचे आरक्षण झाले आहे. आता केवळ अनुसूचित जातीचे (एससी) आरक्षण राहिले आहे. त्यामुळे महापौरपदासाठी 'एससी'चे आरक्षण पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रारूप प्रभागरचनेचा



**महापौरपदाच्या आरक्षण निश्चितीसाठीची माहिती शासनाने मागविली होती. त्यानुसार आजपर्यंतच्या महापौरपदाचा आरक्षण सुरु झालेल्याचा आणि संपुष्टात आलेल्याचा कालावधी, लोकसंख्येची माहिती पाठविली आहे, असे निवडणूक विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितले.**

आराखडा प्रसिद्ध केला आहे. त्यावर आलेल्या हरकतींवर सुनावणीची प्रक्रिया पार पडली आहे. ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अंतिम प्रभागरचना प्रसिद्ध होणार आहे. राज्य शासनाने महापौर आरक्षण निश्चितीची प्रक्रिया सुरू केली आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेने २००१ पासूनचा आरक्षणाचा सविस्तर तपशील राज्य शासनाच्या नगरविकास खात्याकडे पाठविला आहे.

महापौर आरक्षण लागू झालेल्या दिनांकापासून म्हणजेच सन २००१ पासून ते २०२२ पर्यंतच्या आरक्षणाचा तपशील पाठविला आहे. त्यामध्ये आरक्षणाचा जातप्रवर्ग, आरक्षण सुरू झालेल्याचा आणि संपुष्टात आलेल्याचा कालावधी, आजपर्यंतच्या महापौरांचे नाव आणि त्यांचा कालावधी, तसेच २०११ ची जनगणना, लोकसंख्येची माहिती, अनुसूचित जाती – जमातींची माहिती पाठविण्यात आली आहे.

### महापौरपदाचे आजपर्यंतचे आरक्षण

**पिंपरी-चिंचवडच्या महापौरपदी खुला प्रवर्ग, नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी), अनुसूचित जमाती (एसटी) या प्रवर्गाच्या नगरसेवकांना संधी मिळाली आहे. त्यात प्रकाश रेवाळे (इतर मागास प्रवर्ग) , मंगला कदम (महिला खुला प्रवर्ग), डॉ, वैशाली घोडेकर (नागरीकांचा मागास प्रवर्ग) , अपर्णा डोके (नागरीकांचा मागास प्रवर्ग), योगेश बहल (खुला प्रवर्ग) , मोहिनी लांडे (महिला खुला प्रवर्ग) , शकुंतला धराडे (अनुसूचित जमाती), नितीन काळजे (नागरीकांचा मागास प्रवर्ग), राहुल जाधव (नागरीकांचा मागास प्रवर्ग), उषा ढोरे (महिला खुला प्रवर्ग) यांचा समावेश आहे. आता केवळ अनुसुचित जाती (एससी) चे आरक्षण राहिले आहे. त्यामुळे महापौरपदासाठी 'एससी'चे आरक्षण पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.**

महापालिकेचे एकूण ३२ प्रभाग असून, नगरसेवकांची संख्या १२८ आहे. सन २०११ च्या जनगणेनुसार शहराची १७ लाख २७ हजार ६९२ लोकसंख्या आहे. अनुसूचित जातीची दोन लाख ७३ हजार ८१० आणि अनुसूचित जमाताची ३६ हजार ५३५ लोकसंख्या आहे.

## पायलट होण्याची सुवर्णसंधी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विमानवाहतुकीत करिअर करण्याची इच्छा असलेल्या तरुणांसाठी सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. यंग लर्नर्स एव्हिएशन अकॅडमी आणि सर बाळासाहेब देवरस एव्हिएशन गॅलरी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने "कमर्शियल पायलट लायसन्स" या विषयावर विशेष सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे. हा सेमिनार रविवार, २१ सप्टेंबर रोजी सकाळी अकरा वाजता शिवाजीनगर येथील पीएमसी मेट्रो स्टेशनजवळील एव्हिएशन अँड स्पेस म्युझियम येथे होणार आहे. या सेमिनारचे नेतृत्व यंग लर्नर्स एव्हिएशन अकॅडमीचे संस्थापक कॅप्टन नितीन बेंद्रे करणार आहेत. विमानवाहतुकीतील त्यांचा प्रदीर्घ अनुभव विद्यार्थ्यांना दिशा देणारा आणि प्रेरणादायी ठरणार आहे. त्यांच्यासोबत संचालक रश्मी इंदुलकर आणि मुख्य ग्राउंड प्रशिक्षक कॅप्टन अतुल वास्कलेही आणि इतर वैमानिक उपस्थित राहणार असून विद्यार्थी व पालकांच्या शंकांचे निरसन या सेमिनारमध्ये होणार असल्याची माहिती नितीन बेंद्रे यांनी पत्रकार परिषदेत दिली या पत्रकार परिषदेला यंग लर्नर्स एव्हिएशन अकॅडमीचे संचालक रश्मी इंदुलकर, यंग लर्नर्स एव्हिएशन अकॅडमीचे मुख्य ग्राउंड प्रशिक्षक कॅप्टन अतुल वास्कले आणि सर बाळासाहेब देवरस एव्हिएशन म्युझियमचे व्यवस्थापक सुजित शेंडकर उपस्थित होते.

### पुण्यात महापालिकेच्या उमेदवारीसाठी फडणवीसांकडे वजन असणाऱ्या

## नेत्यांकडे इच्छुकांच्या फेऱ्या वाढल्या

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय जनता पक्षाकडून आगामी महापालिका निवडणुकीची उमेदवारी मिळवण्याचा मार्ग कोथरूडमधून जात असल्याच्या पार्श्वभूमीवर इच्छुकांनी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या घरच्या, कार्यालयाच्या वाऱ्या वाढवल्या आहेत.

स्थानिक आमदारांना विश्वासात घेऊन या दोन्ही नेत्यांची मर्जी सांभाळण्यासाठी भाजपच्या इच्छुकांची तारेवरची कसरत सुरू आहे. गेल्या काही दिवसांत शहरभरातील कोथरूडमध्ये वाढलेल्या वाऱ्या हा इच्छुकांच्या चर्चेचा विषय ठरला आहे. भाजपच्या शहर कोअर कमिटीमध्ये चंद्रकांत पाटील, मुरलीधर मोहोळ, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, शहराध्यक्ष धीरज घाटे, माजी सभागृह नेते



गणेश बोडकर आणि श्रीनाथ भिमाले यांचा समावेश आहे. महिनाभरातून एकदा तरी या कोअर कमिटीची बैठक होते. आगामी महापालिका निवडणुकांच्या दृष्टीने कोअर कमिटीच्या बैठकांचे सत्र वाढले असून, आगामी निवडणुकीसाठी पक्षात प्रवेश द्यावयाच्या नावांवरही चर्चा झडत आहे. उमेदवारी देताना कोथरूडमधील नेत्यांच्या शब्दाला वजन राहणार असल्याने या नेत्यांची मर्जी राखण्यासाठी इच्छुकांची धावपळ सुरू आहे. भाजपकडून प्रारूप प्रभागरचना तयार करताना माजी नगरसेवकांच्या तुलनेत आमदारांच्या सूचनांना प्राधान्य देण्यात आले आहे; तसेच उमेदवारी देतानाही आमदारांच्या सूचनांना प्राधान्य देण्यात येईल, असेच चित्र सध्या दिसते आहे. ज्या जागांबाबत स्थानिक आमदार आणि कोअर कमिटी यांचे एकमत होणार नाही, अशा उमेदवारांचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत घेतला जाईल, अशी साधारण रचना असल्याचे कोअर कमिटीतील सदस्यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांसमोर होणाऱ्या बैठकीत चंद्रकांत पाटील आणि मुरलीधर मोहोळ यांच्या सूचनांचा अधिक विचार केला जाण्याची दाट शक्यता असल्याने इच्छुकांनी कोथरूडचा रस्ता धरला आहे.

### कोथरूडमध्ये सर्वाधिक स्पर्धा

**भाजपचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या कोथरूडमध्ये यंदाही सर्वाधिक इच्छुक आहेत. त्यामध्ये चंद्रकांत पाटील आणि मुरलीधर मोहोळ यांच्या समर्थकांकडून उमेदवारीची मागणी होणार आहे. पाटील आणि मोहोळ यांच्यात या समर्थकांवरून चर्चाही झडल्याचे समजते. त्यामुळे कोथरूडमध्ये उमेदवारी मिळवताना दोन्ही नेत्यांची मर्जी राखण्यासाठी सर्वाधिक धावपळ होताना दिसत आहेत. राज्यसभेच्या खासदार मेधा कुलकर्णी यांच्याकडूनही त्यांच्या समर्थकांसाठी उमेदवारी मागितली जाणार आहे. त्यामुळे कोथरूडमध्ये उमेदवारी निश्चित करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनाही अनेकांच्या नाकदुऱ्या काढाव्या लागतील, अशी चर्चा आहे.**

## मेट्रो फिडर बससेवेची सचिन दोडके यांची मागणी

- खासदार सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीमध्ये पीएमपीएल च्या अधिकाऱ्यांना दिले निवेदन




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील वारजे व आसपासच्या परिसरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण वाढले आहे. या भागातून पुण्यातील विविध भागांमध्ये दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी असून बहुतांश प्रवासी मेट्रोचा वापर करतात.

मात्र वनाज मेट्रो स्टेशनपर्यंत पोहोचण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीची कोणतीही सोय नसल्याने नागरिकांना रिक्षा किंवा खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे मेट्रो प्रवास अपेक्षेइतका सोयीस्कर ठरत नाही.

या पार्श्वभूमीवर कर्तव्यदक्ष नेतृत्व म्हणून ओळख असलेले माजी नगरसेवक सचिन दोडके यांनी वनाज मेट्रो स्टेशनपर्यंत पीएमपीएमएलची मेट्रो फिडर बससेवा सुरू करण्याची मागणी केली. यासंदर्भात आदरणीय संसदरत्न खासदार सौ. सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत पीएमपीएमएल व्यवस्थापकांना निवेदन देण्यात आले.

वारजे परिसरातील हिल व्ह्यू सोसायटी, शोभापुराण सोसायटी, शिफ्ला चौक, अतुलनगर, रूणवाल सोसायटी, आदित्य गार्डन सिटी, वारजे हायवे चौक, पॉप्युलर नगर, करण ग्रीन या मार्गावर गोलाकार फिडर बससेवा सुरू झाल्यास नागरिकांचा प्रवास अधिक सोयीस्कर होईल.

तसेच मेट्रोच्या प्रवासी संख्येत वाढ होण्यास देखील मदत होईल, असे या निवेदनात नमूद करण्यात आले. यावेळी परिसरातील नागरिक उपस्थित होते.या निवेदनावर तात्काळ कार्यवाही करू अशा श्वासन पीएमपीएल च्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. दरम्यान ही बस सेवा सुरू झाल्यास या भागातील नागरिकांना मोठा फायदा होणार आहे.

## सोनालिकाची आजवरची सर्वोच्च एकंदर १०,९३२ ट्रॅक्टरची विक्री

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

- देशांतर्गत बाजारपेठेतील दमदार २८ टक्के वाढीमुळे मिळाली चालना

भारतातील नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेला सोनालिका ट्रॅक्टर भारतातील शेतकऱ्यांचा खरा भागीदार म्हणून आपली भूमिका मजबूत करत आर्थिक वर्ष २६ मध्ये आक्रमकपणे पुढे जात आहे. कंपनीने आर्थिक वर्ष २६ मध्ये एक नवीन ऐतिहासिक कामगिरी साध्य केली आहे. कंपनीने ऑगस्टमधील आजवरची सर्वाधिक एकंदर १०,९३२ ट्रॅक्टरची विक्री नोंदवली असून यामध्ये देशांतर्गत बाजारपेठेतील २८ टक्के ची मजबूत वाढ समाविष्ट आहे. स्थानिक शेतीच्या गरजांबद्दलच्या तिच्या गहन आकलनाचे प्रतिबिंब या वाढीत पडले आहे. संपूर्ण मनःशांती प्रदान करणारे आणि शेतीच्या वाढीला चालना देणारे शेतकरीकेंद्रित हेवी ड्युटी ट्रॅक्टर विकसित करण्याच्या कंपनीच्या कटिबद्धतेमुळे हे सातत्यपूर्ण यश मिळत आहे. सोनालिका ट्रॅक्टर्सने त्यांच्या अधिकृत वेबसाइटवर ट्रॅक्टरच्या किमती प्रदर्शित करण्याचा अभूतपूर्व निर्णय तीन वर्षांपूर्वी घेतला होता. तो आजही भारतीय कृषी व्यवस्थेतील पारदर्शकतेचे प्रतीक म्हणून कायम आहे.

# धायरीतील ग्रामस्थांचे सर्वपक्षीय गाजर वाटप आंदोलन

### कोणत्याही पायाभूत सुविधा नाहीत तरीही कर का भरणार ? आंदोलकांचा सवाल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट होऊनही येथील नागरिकांना पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही."महापालिका पायाभूत सुविधा न देता फक्त कर वसूल करते, दिलेली आश्वासने पाळत नाही. आम्हाला मूलभूत सुविधा न देता फक्त कर वसूल करायचा असेल, तर हा कर तातडीने बंद करावा. आमच्या आर्थिक कंबरड्याला महापालिका मारक ठरत आहे."

म्हणत धायरीतील उंबऱ्या गणपती चौकामध्ये सर्वपक्षीय गाजर वाटप आंदोलन करण्यात आले. शेड साठी भाडे मिळते 10-12 रुपये प्रति चौरस फूट व टॅक्स काढलाय 15 रुपये प्रति चौरस फूट येत्या निवडणुकी आधी याचा निकाल न लावल्यास अनेक जागा मालक शेड पाफण्याच्या तयारीत आहेत. निर्णय वेळेत व योग्य न घेतल्यास स्थानिक नागरिक,शेड मालक सत्ताधारी बीजेपी सरकारी विरुद्ध मोठी मोहीम येत्या निवडणुकीत घेणार आहेत. स्थानिक लोक शेड काढून घेणार असल्यामुळे अनेक उद्योग स्तलातरित किंवा बंद होणार आहेत. त्यामुळे बेरोजगारी आणखी वाढणार आहे.

एक वर्षां पूर्वी निवडणुकी पूर्ती स्थागिती दिली पूर्ण सूट आजही दिली नाही. सुविधा नसतानाही इतर प्रमाणे




रेग्युलर टॅक्स भरायला नागरिक तयार आहेत. परंतु तिप्पट टॅक्स भरणे अशक्य आहे. त्याच प्रमाणे एकाच गावांना दोन न्याय कसे वरील हद्दीस वेगळा कर खालील हद्दीस वेगळा कर असे का? असा सवालही आंदोलकांनी प्रशासन व सत्ताधारी नेत्यांना केला.

या तिप्पट कर आकारणीच्या वाढीव कर आकारणीच्या निषेधार्थ नागरिकांनी गाजर वाटप करून महापालिकेचे लक्ष वेधले. वाढीव कर/तिप्पट शास्ती कर आठ दिवसांत मागे घ्यावा, अन्यथा सगळ्या समाविष्ट गावातील लोकांसमवेत मोठे आणि अती तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा ग्रामस्थांनी दिला.

उंबऱ्या गणपती चौकात झालेल्या या आंदोलनात आम आदमी पक्षाचे धनंजय बनकर, निलेश दमिष्टे अध्यक्ष सोशल मीडिया खडकवासला मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी(शरद चंद्र पवार) सनी रायकर, महादेव पोकळे, माजी जिल्हा परिषद सदस्या, व धायरीच्या प्रथम महिला सरपंच सुरेखाताई दमिस्टे, माजी सभापती प्रभावतीताई भूमकर, बहुजन समाज पार्टीचे अरुणअण्णा गायकवाड, संदीप विठ्ठल पोकळे, राजेश पोकळे,राजू पोकळे,सागर लायगुडे,अमर खेडेकर, श्री मानकर आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या काळात तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार भीमराव तापकीर यांच्या पाठपुराव्याचे कौतुक केले होते आणि करकपातीचे आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात कोणतीही करकपात झाली नाही, उलट नागरिकांना दिशाभूल करून कर वाढवण्यात आला, असा आरोप यावेळी आंदोलनकर्त्यांनी केला.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.